24 APR 2023 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवस्पंदन मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात शिवस्पंदन क्रीडा महोत्सवांतर्गत शुक्रवारी सकाळी ७ वाजता ५ किलोमीटरच्या कॅम्पस मॅरेथॉन स्पर्धेत साडेतीनशेहून अधिक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, विद्यार्थी विकास विभाग संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. आर. व्ही. गुरव आदींच्या उपस्थितीत स्पर्धेला प्रारंभ झाला.

कुलगुरू डॉ. शिर्के यांनी फ्लॅग ऑफ करून स्पर्धेला प्रारंभ केला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यासमोरून मॅरेथॉनला प्रारंभ झाला. भूगोल अधिविभाग, विद्यार्थिनी वसतिगृह, पाच बंगला, क्रीडा पॅव्हेलियन, गेट क्रमांक आठ, परीक्षा भवन क्र. १, भाषा भवन, रसायनशास्त्र अधिविभाग ते सिंथेटिक ट्रॅक मैदान असा पाच किलोमीटरचा मार्ग स्पर्धकांनी पूर्ण केला. डॉ. सागर डेळेकर, डॉ. नीलांबरी जगताप, डॉ. कैलास सोनावणे, डॉ. ए. ए. कोळेकर, डॉ. नीलेश तरवाळ आदींच्या सहभागाने विद्यार्थ्यांत उत्साह होता.

**सर्वाधिक प्राधान्य आरोग्यालाच : कुलगुरू डॉ. शिर्के**

मॅरेथॉनच्या सांगता प्रसंगी कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, आयुष्यात उत्तम शिक्षण आणि करिअर हे प्राधान्याचे विषय असतातच, पण उत्तम आरोग्याखेरीज त्यांची साध्यता मुश्कील होऊन बसते. त्यामुळे सर्वांनीच उत्तम आरोग्यसंपदेला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे. मॅरेथॉनमुळे विद्यापीठातील पाच किलोमीटरचा उत्तम ट्रॅक सर्वांना माहिती झाला आहे. त्यामुळे सरावात सातत्य ठेवून आरोग्य संवर्धन करत राहावे, असे आवाहनही त्यांनी केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आयोजित शिवस्पंदन क्रीडा महोत्सवात मॅरेथॉन स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. शेजारी प्र कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. शरद बनसोडे, डॉ. प्रकाश गायकवाड आदी.**

तरुण भारत

## थोडक्यात महत्वाचे

# शिवाजी विद्यापीठात आज महर्षी वि. रा. शिंदेंवर परिसंवाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या वतीने महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षानिमित्त 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि विविध चळवळी' यावर सोमवारी दि. २४ रोजी दुपारी ३.०० वाजता मराठी विभागात येथे परिसंवादाचे आयोजन केले आहे. परिसंवादात महर्षी शिंदे आणि राजकीय चळवळी, महर्षी शिंदे आणि धर्मसुधारणेची चळवळ, महर्षी शिंदे आणि डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी यावर मांडणी केली जाणार आहे. ज्येष्ठ विचारवंत प्रा. अशोक चौसाळकर, डॉ. अवनीश पाटील, रमेश चव्हाण सहभागी होणार आहेत, अशी माहिती महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अभ्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

लोकमत

# शिवस्पंदनमध्ये तंत्रज्ञान अधिविभाग सर्वसाधारण विजेता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा व शारीरिक शिक्षण अधिविभागामार्फत आयोजित 'शिवस्पंदन क्रीडा महोत्सव २०२२-२०२३' मध्ये तंत्रज्ञान अधिविभाग सर्वसाधारण प्रथम विजेता (१३१ गुणांसह) आणि रसायनशास्त्र अधिविभाग सर्वसाधारण उपविजेता ठरला. प्राणीशास्त्र अधिविभागाने तृतीय स्थान पटकावले.

**अंतिम निकाल**

सर्वसाधारण विजेतेपद: तंत्रज्ञान अधिविभाग, रसायनशास्त्र अधिविभाग, प्राणीशास्त्र अधिविभाग.

१०० मीटर धावणे (पुरुष): अर्जुन पवार , गणेशानंद रवींद्र भट, करण उमाकांत जाधव; २०० मीटर धावणे (पुरुष): संकेत पाटील, विश्वजित मधुकर हवालदार, ऋषिकेश किशोर पाटील; ४०० मीटर धावणे (पुरुष) : मयुरेश जयेंद्र हसोलकर, रोहित बंडू शेवाळे, अक्षय महांकाळे; गोळाफेक (पुरुष) : गजानन विष्णू मोरबाळे, सचिन कांबळे, मनोज लहू संकपाळ. लांब उडी (पुरुष): ओम जाधव , संतोष नालकर, गणेशानंद रवींद्र भट.

पुढारी

# ‘महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि विविध चळवळी’ विषयावर आज परिसंवाद

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे महर्षी विठ्ठल रामजी शिंदे शतकोत्तर सुवर्ण जयंती वर्षानिमित्त ‘महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि विविध चळवळी’ या विषयावर सोमवारी (दि. २४) दुपारी तीन वाजता मराठी विभाग येथे परिसंवादाचे आयोजन केले आहे.

परिसंवादात महर्षी शिंदे आणि राजकीय चळवळी, महर्षी शिंदे आणि धर्मसुधारणेची चळवळ, महर्षी शिंदे आणि डिप्रेस्ड क्लासेस मिशन सोसायटी या विषयावर मांडणी केली जाणार आहे. ज्येष्ठ विचारवंत प्रा. अशोक चौसाळकर, डॉ. अवनीश पाटील, श्री. रमेश चव्हाण रिसवांदात सहभागी होणार आहेत. परिसंवादास उपस्थित राहावे, असे आवाहन महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाचे समन्वयक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी केले आहे.

लोकमत

# ग्रामीण महाविद्यालय सुरू करण्यास मुभा

## सिद्धार्थ शिंदे : पाच वर्षाचा बृहत आराखडा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : प्रत्येक तालुक्यात विशेषत: ग्रामीण भागात पारंपरिक शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांसह व्यावसायिक आणि कौशल्यपूर्ण शिक्षण देणारी सर्व शाखांची महाविद्यालये सुरू करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या पाच वर्षांच्या बृहत आराखड्यात खुले बिंदू टाकले आहेत. यामुळे कोणालाही पाच वर्षांत ग्रामीण भागात कोणतेही महाविद्यालय सुरू करण्याची आता मुभा असेल, अशी माहिती राज्यपालनियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य आणि बृहत आराखडा समितीचे अध्यक्ष सिद्धार्थ शिंदे यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली.

शिवाजी विद्यापीठाचा पाच वर्षांचा बृहत आराखडा तयार झाला आहे. येत्या बुधवारपर्यंत विविध अधिकार मंडळांच्या बैठकीत हा आराखडा मंजूर होणार असल्याने केवळ शैक्षणिक क्षेत्रातीलच नव्हे तर सामान्य व्यक्तीलाही महाविद्यालय सुरू करण्याचा अधिकार मिळेल. विद्यापीठांच्या स्थापनेपासून असे अधिकार सामान्य व्यक्तीला मिळालेले नव्हते. बृहत आराखड्यात अशा प्रकारचे बिंदू टाकणारे शिवाजी विद्यापीठ हे पहिलेच विद्यापीठ असेल.

### विद्यार्थ्यांनीही केल्या सर्वाधिक सूचना

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत बृहत आराखड्यानुसार नवीन महाविद्यालये, अभ्यासक्रम सुरु केले जाणार आहेत. त्या अनुषंगाने संस्थाचालक, प्राचार्य, पालक, शिक्षक, उद्योगपती, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थ्यांकडून पाच हजार १५० सूचना प्राप्त झाल्या आहेत, त्यांतील तब्बल ३१७५ सूचना या केवळ विद्यार्थ्यांकडून आल्याचे सांगून त्यांनी यासाठी तीन जिल्ह्यांत बैठका घेतल्याचेही त्यांनी सांगितले.

### स्थलांतरामुळे झालेल्या समस्या सुटतील

कोल्हापूर जिल्ह्यापेक्षा सांगलीची आणि त्यापेक्षाही वाईट अवस्था सातारा जिल्ह्यातील शिक्षणाची आहे. भविष्यात प्रत्येक तालुक्यात सर्वच विद्याशाखांची महाविद्यालये सुरू झाल्यास स्थलांतरामुळे निर्माण होणारी समस्या सुटेल, असेही ते म्हणाले

पुढारी

# विद्यापीठ बृहत आराखड्यात प्रत्येक तालुक्यात सर्व अभ्यासक्रमांच्या शिक्षण संस्था प्रस्तावित

## राज्यपाल नियुक्त सदस्य सिद्धार्थ शिंदे यांची माहिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाचा पुढील पाच वर्षांचा बृहत आराखडा तयार झाला असून अधिकार मंडळ मान्यतेच्या अंतिम टप्प्यात आहे. ग्रामीण भागातील गरजू, तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचावे. तालुका शैक्षणिकदृष्ट्या संपन्न व्हावा, यासाठी तालुक्यात सर्व अभ्यासक्रमांच्या शिक्षण संस्था प्रस्तावित केल्या असून त्यासाठी बिंदू निश्चित केले आहेत, अशी माहिती राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य व बृहत आराखडा समिती अध्यक्ष सिद्धार्थ शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत बृहत आराखड्यानुसार नवीन महाविद्यालये, अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. त्या अनुषंगाने संस्थाचालक, प्राचार्य, पालक, शिक्षक, उद्योगपती, प्रशासकीय अधिकारी, विद्यार्थ्यांकडून ५ हजार १५० सूचना प्राप्त झाल्या आहेत. तीन जिल्ह्यांत बैठका घेतल्या आहेत.

आजही पदवीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या जास्त असली, तरी साक्षरतेचे प्रमाण कमी आहे. शिक्षणासाठी मुलींना अडचणी येत आहेत. त्यामुळे पारंपरिक, व्यावसायिकसह इतर अभ्यासक्रमांची महाविद्यालये तालुक्यात सुरू झाल्यावर विद्यार्थ्यांचे स्थलांतर थांबेल. तालुका सर्वच क्षेत्रांत स्वयंपूर्ण बनण्यास हातभार लागणार आहे. यासाठी सामाजिक संस्था, एनजीओ, निवृत्त शिक्षक संघटनांनी पुढे येणे गरजेचे असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

पुढारी

# राजर्षी शाहू महाराज माहितीपट महोत्सव सहभाग नोंदणीसाठी ४ मे पर्यंत मुदतवाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन विभागाच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त राजर्षी छत्रपती शाहू महाराज माहितीपट महोत्सव २०२३ चे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त शाहू महाराजांच्या योगदानावर माहितीपट निर्मिती स्पर्धा होणार आहे. सहभाग नोंदणीसाठी ४ मे पर्यंतची मुदतवाढ दिली आहे.

महोत्सवात प्रवेशासाठी नोंदणी करणे आवश्यक असून, प्रवेश निःशुल्क आहे. महोत्सवाची मध्यवर्ती संकल्पना, सुचविलेले विषय, नियम, अटी तसेच नोंदणी अर्ज नमुना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर http:/// www. unishivaji. ac. in उपलब्ध आहे.

स्पर्धेतील विजेत्यांना रोख स्वरूपाची पारितोषिके, शिवाजी विद्यापीठाचे सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. ११ व १२ मे रोजी मानव्यशास्त्र सभागृहात होणार असल्याची माहिती विभागप्रमुख प्रा. डॉ. निशा पवार यांनी दिली.